.क्र.नांवाशमनपा/नसका/सिआर-12/2019
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:- 20.11.2019

<u>दिनांक 22.11.2019 रोजी आयोजीत करण्यात आलेली मनपाकेची सर्वसाधारण सभेची पुरवणी विषय पत्रिका</u>

**विषय क्रं. 01**

मा. आयुक्त यांचे पत्र दिनांक 29.11.18 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने सफाई आस्थापनेवर कार्यरत असलेल्या 06 पुरुष मजुर या कर्मचा-यांचे पदनाम बदलुन ते स्वच्छता निरीक्षक असे करुन त्या पदाची वेतनश्रेणी देण्याबाबतचा ठराव क्रं. 85 दिनांक 12.10.18 समंत केलेला आहे पुरुषमजुर ही पदे वर्ग-4 संवर्गातील असुन स्वच्छता निरीक्षक हे पद वर्ग-3 संवर्गातील आहे त्याच प्रमाणे दोन्ही पदांची वेतनश्रेणीही वेगवेगळी आहे ही सर्व वस्तुस्थिती लक्षात घेता मनपा स्थायी समितीचा ठराव क्रं. 85 दि. 12.10.18 हा संयुक्तीक व सनदशीर ठरत नसल्यामुळे सदरचा ठराव महाराष्ट्र मनपा अधिनियमातील कलम 451 (3) नुसार अंतिमता विखंडीत करण्यात येत आहे त्याची नोंद घेणे बाबत.

**विषय क्रं. 02**

**विषय** :- स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत कचरा मुक्त शहरांना तारांकित मानांकन देणेबाबत

**संदर्भ** :- 1) शासन निर्णय क्रं. स्वमअ-2015/प्र.क्र.23/नवि-34 दिनांक 15 मे 2015

2) शासन निर्णय क्रं. स्वमअ-2018/प्र.क्र.82/नवि-34 दिनांक 02 जुन 2018

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अमलबजावणी संदर्भाधीन दिनांक 15 मे, 2015 रोजीच्या शासन निर्णयान्वये संपुर्ण राज्या ``मिशन मोड`` पध्दतीने सुरु आहे या अभियानांतर्गत शहरे ``हगणदारी मुक्त`` करणे व घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत ``स्वच्छ`` करणे या दोन प्रमुख बाबींचा समावेश आहे

स्वच्छ महाराष्ट अभियान (नागरी) ची अमलबजावणी करुन राज्याचा नागरी भाग दिनांक 01 ऑक्टोंबर 2017 रोजी ``हगणदारी मुक्त`` घोषीत करण्यात आला आहे आता या अभियानाअंतर्गत घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत शहरे स्वच्छ करण्याचे काम प्रतीपथावर आहे तथापि नागरी भागात व सार्वजनिक ठिकाणी कांही प्रमाणात होत असलेल्या अस्वच्छतेमुळे नागरीकांकडून प्रतिकुल प्रतिक्रिया व्यक्त होतांना दिसुन येतात.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता शहरांना कचरा मुक्त होण्याकरिता एकूणच स्वच्छतेमध्ये क्रमाक्रमाने आणखी सुधारणा होण्यास्तव शहरांना तारांकित मानांकर (Star Rating) देण्याबाबतची नियमावली (A Protocol for Making Cities Garbage Free) केंद्र शासनाने तयार केलेली असुन सदरची नियमावली राज्य शासनाने स्विकारली आहे. त्याच बरोबर राज्यातील कचरामुक्त शहरांना तारांकित मानांकनाची नियमावली लागु करण्यास मान्यता दिलेली आहे.

शहरांना कचरा मुक्त होण्याकरिता तारांकित मानांकन (Star Rating) देण्याबाबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार खालीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे.

* कचरा मुक्त शहराच्या तारांकित मानांकनाबाबत स्वयं घोषणा करण्यापुर्वी शहरातील सर्व प्रभाग सदस्यांकडून संबंधीत प्रभागाचे कचरा मुक्त तारांकित मानांकनाबाबत घोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे.
* प्रभाग सदस्यांकडून प्राप्त झालेल्या तारांकित मानांकनापैकी जे निम्न तारांकित मानांकन असेल तेच तारांकित मानांकन त्या शहराचे तारांकित मानांकन म्हणुन पडताळणीसाठी ग्राहय धरण्यात येईल.
* प्रभाग सदस्यांकडून तारांकित मानांकनाबाबत घोषणापत्र सादर झाल्यानंतर संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी ठराव पारीत करुन सार्वजनिक घोषणा करु शकतील.
* सदरा घोषणेच्या अनुषंगाने जनतेच्या हरकती व सुचना 15 दिवसांच्या कालावधी देवुन मागवु शकतील.
* त्याअनुषंगाने महापौर/नगराध्यक्ष/आयुक्त/मुख्याधिकारी यांनी प्राप्त हरकती व सुचनांची पडताळणी करुन प्रस्तावित मानांकनाच्या बाबतीत समाधान झाल्यास कचरा मुक्त शहराच्या तारांकित मानांकरना बाबत (3, 5 व 7 तारांकित पैकी कोणतेही मानांकन) स्वयंघोषणा करावयाची आहे.
* त्यानुसार कचरा मुक्त शहराच्या तारांकित मानांकनाबाबत शहराने स्वयंघोषणा करुन तसा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर करावा.
* कचरा मुक्त तारांकित मानाकनाबाबत शासनाच्या स्तरावर 3, 5 व 7 तारांकित मानांकनाबाबत केंद्र शासनाकडुन पडताळणी / प्रमाणीकरण करण्यासाठी राज्य शासना मार्फत केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल.
* केंद्र शासनाने नियुक्त समितीकडून याची पडताळणी / प्रमाणीकरण करुन केंद्र शासन या शहरांचे तारांकित मानांकन जाहिर करील.
* कचरा मुक्त शहराचे तारांकित मानांकन 01 वर्षाच्या मुदतीसाठी असेल प्रत्येक वर्षी असा प्रकारे पुनर्मुल्यांकन व पुनप्रमाणीकरण केले जाईल.
* कचरा मुक्त शहराचे कोणतेही तारांकित मानांकन मिळविण्यासाठी स्वयं घोषणेच्या प्रणालीमध्ये तसेच प्रत्यक्ष शहर कचरा मुक्त करण्याच्या प्रक्रियेमध्ये शहरातील नागरीकांचा सक्रिय सहभाग असणे आवश्यक आहे.
* **कचरा मुक्त शहराचे तारांकित मानांकन ठरवितांना विचारात घेतली जाणारी 10 उपांगे / बाबी पुढीलप्रमाणे आहेत**

1- घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे (Door to Door Collection)

2- निर्मितीच्या जागीच कच-याचे विलगीकरण करणे (Segregation at source)

3- सार्वजनिक, वाणिज्य व रहिवाशी भागातील साफसफाई करणे तसेच मलनिस्सारण व नदीनाल्यांचे पृष्ठभाग स्वच्छ करणे (Sweeping of public, commercial and residential areas (No visible eyesores on streets) and cleaning of storm drains and surface of water bodies)

4- शहरातील कचरा पेटया आणि पदार्थ पुनप्राप्ती सुविधा (Waste storage Bins, Litter Bins and Material recovery facility)

5- मोठया प्रमाणात कचरा निर्माण करणारे व रहिवाशी कल्याण संघ यांचेकडून नियमांचे पालन (Bulk Waste Generators and Residential Welfafe Asociations compliance)

6- कच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करणे शास्त्रोक्त पध्दतीने क्षेपणभुमी तयार करणे आणि बांधकामाचा राडा रोडा (Scientific Waste Processing, Scientific Landfilling and C&D Waste)

7- अस्वच्छते बाबत शिक्षा दंड व वापरकर्ता शुल्क आकारणी तसेच प्लास्टीक बंदीची अमलबजावणी (User Fees Penaltiesm Spot Fines for littering and enforcement of ban on thin plastic)

8- नागरीकांच्या समस्यांचे निराकरण व अभिप्राय प्रणाली (Citizen grievance redressal and feedback system)

9- कच-याच्या ढीगांचे निर्मुलन करणे (Efadicition of crude dumping of garbage and dump remediation)

10 शहरांती गटारांची व नैसर्गिक जलसाठयांची स्वच्छता (Cleaning of storm water drains and surface of water bodies)

11 कालानुरुप कचरा निर्मितीचे प्रमाण घटविणे (Waste reduction application of 3-R principles in MSW)

12 शहर सौंदर्यीकरण (City Beatification)

उपरोक्त नमुद कार्यपध्दतीनुसार स्वयं मुल्यांकन व स्वयं पडताळणी करुन कचरा मुक्त शहराच्या तारांकित मानांकनाबाबत स्वं घोषणा करण्याची कार्यवाही करुन प्रस्ताव राज्य अभियान संचालक यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

कचरा मुक्त शहरांचे तारांकित मानांकन ठरवितांना विचारात घेतली जाणारी जी-10 उपांगे/बाबी आहेत, त्यापैकी जास्ती जास्त बाबींची प्रभाविपणे अमलबजावणी केल्यामुळे नांदेड शहर 03 तारांकित मानांकन प्राप्त होण्यास पात्र आहे. करिता कचरा मुक्त शहरांचे 3, 5 व 7 पैकी तारांकित मानांकन बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या समंती व निर्णयास्तव सादर.

**विषय क्रं. 03**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत शहरातील ज्या कुटूंबांकडे शौचालयाची सुविधा उपलब्ध नसल्याने जी कुटूंबे उघडयावर शौचास जातात अशा कुटूंबांना वैयक्तीक घरगुती शौचालय (IHHL) अथवा सामुदायीक शौचालय (CT) सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची प्रभावी अमलबजावणी झाल्याने केंद्र व राज्य सरकारने नांदेड शहर हागणदारी मुक्त झाल्याचे घोषीत केलेले आहे स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अमलबजावणी करीत असतांना शहरात 12 सामुदायीक व 28 सार्वजनिक शौचालयाचे नागरीकांना उपलब्ध करुन दिलेले आहेत. तसेच 04 मोबाईल टॉयलेट सुध्दा उपलब्ध करुन दिलेली आहेत.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत शहरे हागणदारी मुक्त झाल्याने हागणदारी मुक्त शहराचा दर्जा शाश्वत रित्या (ODF Sustainability) टिकविणे आवश्यक आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी अंतर्गत राज्यातील हागणदारी मुक्त झालेल्या शहरात ODF + व ODF ++ चा दर्जा प्राप्त करण्यासाठी शासनाचे निकष खालील प्रमाणे आहे.

| | निकष-1 | निकष-2 | निकष-3 |
|---|---|---|---|
| ODF++ | दिवसाच्या कुइल्याही वेळेस शहराच्या कुइल्याच भागात एकाही व्यक्तीने उघ्डयावर शौचास बसल्याचे आढळून न येणे तसेच शहरांमध्ये कुठेही उघडयावर मानवी विष्ठेचे पुराने न दिसणे | प्रत्येक कुटूंबास संस्थेस व इतर सर्व प्रकारच्या मालमत्तांना शौचालयांची उपलब्ध असणे, किमान 95% कुटूंबाकडे स्वत:ची शौचालये असणे व उर्वरीत कुटूंबांना सुस्थितीतील गट शौचालय अथवा सार्वजनिक शौचालयाची (कमाल 6 कुटूंबाना 1 सिट या प्रमाणे) सुविधा उपलब्ध असणे व ती कुटूंबे त्यांचा नियमित वापर करीत असणे | शहरातील सर्व शौचालये सुरक्षित मैला संकन व विल्हेवाट प्रणालीस जोडलेली असणे, मैलाचे सुरक्षित व नियमित व्यवस्थापन व प्रक्रिये केली जाणे (शौचालये सेप्टिक टाक्यांना जोडलेली असल्यास टाक्या नियमीतपणे साफ होणे व त्यातील मैलावर योग्यती प्रक्रिया करणे) शहरात जमा होणा-या सांडपाण्यावर योग्यती प्रक्रिया करणे |

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत राज्यातील हागणदारी मुक्त झालेल्या ODF + व ODF ++ चा दर्जा प्राप्त करण्यासाठी शासनाने निकषानुसार नांदेड शहर ODF ++ चा दर्जा प्राप्त होणेस पात्र आहे. तसेच शासन निर्णयानुसार नांदेड शहराचा समावेश मलनिस्सारण प्रक्रिया केंद्र (एस.टी.पी) कार्यान्वीत असलेल्या शहरांच्या यादीत होत असल्यामुळे शहरातील मैल्यावर (Septage) तेथील मलनिस्सारण प्रक्रिया केंद्रात शास्त्रेक्त प्रक्रिया करुन शहरास ओडीएफ++ दर्जा प्राप्त करावयाचा आहे.

नांदेड शहर हागणदारी मुक्त झालेले असल्याने शासनाने ठरवुन दिलेल्या निकषानुसार ODF ++ चा दर्जा प्राप्त करुन घेण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करणेकरिता सदरचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या निर्णयास्तव सादर.

**विषय क्रं. 04**

**विषय** :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत चैतन्यनगर महादेव मंदिर ते पिरबु-हाणनगर चौरस्ता ते शास्त्रीनगर पर्यंतच्या रस्त्यावर दोन्ही बाजुने जड वाहनांना प्रवेशबंदी करणे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत, चैतन्यनगर महादेव मंदिर ते पिरबु-हाणनगर चौरस्ता ते शास्त्रीनगर पर्यंतच्या रस्त्यावर दोन्ही बाजुने वाहनांना प्रवेशबंदी करणेसाठी पोलीस निरीक्षक वाहतुक शाखा नांदेड यांनी तसे पत्रात कळविल्यानुसार सदर रस्त्यावरुन जड वाहनांची वाहतुक होत असल्याने त्या भागात ट्रॉफिक जॅम होण्याचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढ झालेली असुन त्यामुळे शाळेची वाहने व रुग्णवाहीका ब-याच वेळा ट्राफिक जॅम मध्ये अडकुन बसतात. त्यामुळे विद्यार्थी व रुग्णांची कुचंबना होत असुन सदर ठिकाणी प्रवेशबंदी करीता लोखंडी पोल बसवुन रॉड बसविण्यात यावे असे कळविले आहे.

त्यानुसार सदर ठिकाणी जड वाहनांना प्रतिबंद करण्यासाठी लोखंडी पोल बसवुन रॉड बसविण्यासाठीच्या मान्यतेकरिता सदरचा प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 05**

नांदेड वाघाळा शहर महानगरपाके मार्फत सालसन 2008 मध्ये लालवाडीच्या बाजुला अरविंदनगर येथील नाल्यावर मलननिस्सारण प्रकल्प उभारणी करण्याकरिता मौजे वजिराबाद सर्वे नं. 58 मधील 60 आर. जमिन सौ. स्नेहल विजय निल्लावार त्यांचेकडुन रुपये 44.00 लक्ष मध्ये खरेदी करुन बांधकाम करण्यात आले सदरचे बांधकाम तत्कालीन कार्यकारी अभियंता लोलापोड (प्रतिनियुक्ती) व उपअभियंता श्री शैलेंद्र जाधव (मनपा) तसेच IL&FS, (PMC) त्यांचे अधिपत्याखाली करण्यात आले आहे. सदरचे बांधकाम करतांना उप अधिक्षक भुमि अभिलेख त्यांचे मार्फत मोजणी करण्यात आली होती.

तथापि प्रत्यक्ष बाधकाम करुन प्रकल्प कार्यान्वीत झाल्यानंतर सौ. अल्का राजीव गुन्हाणे हयांनी श्री जिवनाजी नारायण हाळदे हयांचेकडून सर्व्हे नं. 56(बी) मधन न.भु.क्रं. 3724 मधील खरेदी केलेल्या जागेत सदर प्रकल्पाचे बांधकाम झाल्याबाबत मनपाकडे तक्रार करुन मा. जिल्हाधिकारी हयांचेकडे निवेदन सादर केले त्यावरुन उप अधिक्षक भुमि अभिलेख हयांचे मार्फत त्यांच्या मालकीच्या जमीनीची मोजणी करण्यात आली. प्रत्यक्षात त्यांच्या जागेत प्रकलपाचे किती बांधकाम झाले आहे हया बाबत विभागाकडून विचारना केली असता उप अधिक्षक भुमि अभिलेख यांनी सौ. अल्का राजीव गुल्हाणे त्यांचे खरेदी खतावरील चतु:सिमा व त्यांनी दाखवलेल्या जागेवरुन त्यांची मोजणी करुन त्यांच्या मालकीच्या जागेत 0.29 आर. मध्ये प्रकल्पाचे बांधकाम झाल्याचे त्यांचे अहवालात नमुद करुन जागेचा नकाशा हया कार्यालयात सादर केला आहे.

सदर प्रकरणात हया विभागात उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन सर्व्हे नं. 56 मधील न.भु. क्रं. 3724 हा काशीनाथ नारायण हाळदे हयांच्या मालकीचे असुन न.भु.क्रं. 3725 हे श्री जिवनाजी नारायण हाळदे हयांच्या मालकीचे आहे. सौ. अल्का राजीव गुल्हाणे हयांनी खरेदी केलेली जमीन ही सर्व्हे नं. 56 मधील न.भु.क्रं. 3724 मध्ये श्री जिवनाजी नारायण हाळदे त्यांचेकडुन खरेदी केली आहे. प्रत्यक्षात न.भु.क्रं. 3724 ही जागा श्री जिवनाजी नारायण हाळदे त्यांची नसुन श्री काशीनाथ नारायण हाळदे हयांची आहे. परंतु त्यांच्या खरेदी खतातील चतु:सिमा पाहता उप अधिक्षक भुमि अभिलेख हयांनी मोजणी केलेल्या नकाशावरुन सदर जमीन त्यांची असल्याचे निष्पन्न होत आहे. त्या वरुन पुनश्च हया विभागाकडुन जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख हयांचे मार्फत शहनिशा करण्याबाबत पत्र देण्यात आले त्यावरुन जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख हयांनी उप अधिक्षक भुमि अभिलेख हयांनी केलेली मोजणी बरोबर असुन 0.29 आर. मध्ये प्रकल्पाचे बांधकाम झाले असल्याबाबत अहवाल दिला आहे.

सदर प्रकरणात मनपाकेचे उप अभियंता श्री शैलेंद्र जाधव, जमिन मालक सौ. स्नेहल विजय निल्लावार, मुळ जमीन मालक श्री रमाकांत काशीनाथ हाळदे व श्री श्रीकांत जिवनाजी हाळदे हयांनी नोटीस देऊन खुलासा मागवण्यात आला संबंधीतांनी दिलेल्या खुलाश्या वरुन सदर जमीन मालकी हक्क व जमीनीची क्षेत्रा बाबत निश्चित बोध होत नाही.

तसेच सौ. अल्का राजीव गुल्हाणे हयांनी उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे याचिका क्रं. 7881/2011 दाखल केली असता स. उच्च न्यायालयाने संबंधीत प्राधिकरणाने हया बाबत निर्णय घ्यावा असे नमुद करुन प्रकरण निकाली काढले आहे.

सदर प्रकरणात मनपाकेने खरेदी केलेली जमीन सर्व्हे नं. 58 मधील 60 आर. जागेची आज रोजी मोजणी करुन देण्याबाबत उप अधिक्षक तालुका भुमि अभिलेख हयांना विनंती केली असता. सर्व्हे नं. 58 च्या मोजणीवर न्यायालयाचा मनाई हुकुम असल्याने मोजणी करता येऊ शकत नसल्याचे कळवले आहे.

त्यामुळे मनपा नगररचनाचे आरेखक (ट्रेसर) मार्फत मनपा प्रकल्पाच्या जागेची मोजणी केली असता प्रत्यक्ष प्रकलप उभारलेली जागा ही 60 आर. च भरत असल्याने मनपाच्या ताब्यात 60 आर. जमीन आहे. जर सौ. अल्का राजीव गुल्हाणे हयांची 0.29 आर. जागा मनपा प्रकल्पात आहे तर मनपाने खरेदी केलेली उर्वरीत जमीनीचा प्रत्यक्ष ठिकाण्यावर बोध होत नसल्याने व 60 आर. जागेचा हयापुर्वीच मावेजा दिला असल्याने पुनश्च सौ. अल्का राजीव गुल्हाणे हयांना 0.29 आर. जागेचा मावेजा द्यावा लागणार असल्यान्न प्रकरण निर्णयाकरिता सर्वसाधारण सभेपुढे निर्णयास्तव ठेवण्यात येते. तसेच जर सौ. अल्का राजीव गुल्हाणे हयांना मावेजा दिल्यास त्यांना देण्यात येणा-या मावेजाची रक्कम सौ. स्नेहल विजय निल्लावार हयांचे कडून महसुली खर्चा प्रमाणे वसुल करावी लागेल. तसेच सदर प्रकल्प बांधकामाच्या वेळेस भुसंपादन केलेल्या जागेची श्री शैलेंद्र जाधव तत्कालीन उपअभियंता (सेवानिवृत्त) हयांनी शहनिशा केली नसल्याने सदर प्रकरण उदभवले असल्याने श्री शैलेंद्र जाधव सेवा निवृत्त उपअभियंता हयांना जबाबदार धरुन त्यांच्यावर कार्यालयीन शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावित करणे करिता मा. आयुक्त हयांना अधिकार प्रदान करण्याचे मान्यतेस्तव सादर.

**विषय क्रं. 06**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मंजुर सुधारीत विकास योजनेमध्ये सेक्टर - E मधील सि.स.क्रं. 11823, 11824, 11825, 11826, 11827, 11828, 11829, 11830, व 11831 विकसली मार्केट (केळी मार्केट) लगतचे आरक्षीत कब्रस्तान लगतच्या मालमत्तांवर विद्यमान K – कब्रस्तान या सार्वजनिक वापरासाठी दर्शविलेले असुन सदरच्या मालमत्ता हया खाजगी मालकीच्या आहेत. सदर मालमत्ता हया सध्या रहिवास वापरातील असुन यापैकी कांही मालमत्तावर तत्कालीन नांदेड नगरपालिका कालावधी मध्ये जागेवरील परिस्थितीनुसार बांधकाम परवानगी सुध्दा देण्यात आल्याचे दिसुन आले आहे. तरी मंजुर सुधारीत विकास योजने मध्ये दर्शविण्यात आलेल्या K – कब्रस्तान सार्वजनिक वापर वगळुन रहिवास वापरात समाविष्ट करण्यासाठी विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये किरकोळ फरेबदल करण्याची आवश्यक्ता आहे.

सदरील किरकोळ फेरबदलाच्या प्रस्तावा संदर्भात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) मधील तरतुदीनुसार त्या संबंधीची प्रारुप अधिसुचना प्रसिध्द करणे तसेच हरकती व सुचना घेऊन उक्त फेरदबल करण्यासाठी शासन मान्यता घेण्याकरिता शासनाकडे पाठविण्यासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**विषय क्रं. 07**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मंजुर सुधारीत विकास योजनेमध्ये सेक्टर-G मधील स.क्रं. 31 मौजे वजिराबाद डंकीन येथे 05 एकर जागेवर-G-15-बगीचा (Garden) चे विद्यमान आरक्षण दर्शविलेले असुन सदर 05 एकर जागेपैकी 03 एकर जागा Swerage Treatment Plant (STP) द्यावयाची आहे. तरी मंजुर सुधारीत विकास योजनेमध्ये दर्शविण्यात आलेले G-15-बगीचा (Garden) चे 05 एकर जागेपैकी 03 एकर जागेचा G – बगीचा वापर वगळुन सार्वजनिक वापर (Public Utility) मध्ये समाविष्ट करण्यासाठी विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये किरकोळ फेरबदल करण्याची आवश्यकता आहे.

सदरील किरकोळ फेरबदलाच्या प्रस्ताव संदर्भात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) मधील तरतुदीनुसार त्या संबधीची प्रारुप अधिसुचना प्रसिध्द करणे तसेच हरकती व सुचना घेऊन उक्त फरबदल करण्यासाठी शासन मान्यता घेण्याकरिता शासनाकडे पाठविण्यासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेडच्या सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**विषय क्रं. 08**

<u>विषय :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत महात्माफुले मार्केट PPP तत्वावर विकसीत करणे बाबत</u>

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत महात्माफुले मार्केट PPP तत्वावर विकसीत करणेसाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, सर्वसाधारण सभेने ठराव क्रं. 22 दिनांक 02.04.2013 व दिनांक 27.02.2017 रोजी ठराव क्रं. 146 पारीत केला आहे त्यानुसार (03) तीन वेळेस ई-निविदा मागविण्यात आल्या असता अल्प प्रतिसाद मिळाल्याने फेर आढावा घेवुन त्याप्रमाणे ई-निविदा सुचना जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/7471/2019 दिनांक 23.09.19 अन्वये निविदा मागविले असता एकूण (02) दोन कंत्राटदारांचे निविदा प्राप्त झाल्या सदर (02) दोन कंत्राटदार पात्र झाल्यानुसार निविदा समितीने मान्यता दिल्यानुसार दिनांक 18.10.2019 रोजी फायनान्सीयन बिड उघडले असता प्रिमीयम दर प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | दिलेले प्रिमीयमचे दर रुपये |
|---|---|---|
| 01 | सन्मान बिल्डकॉन प्रा.लि. (जे.व्ही) नांदेड | 13,05,00,000/- |
| 02 | शारदा कन्स्ट्रक्शन अन्ड कार्पो प्रा.लि. नांदेड | 12,51,00,000/- |

उपरोक्त प्रमाणे सर्वात जास्त प्रिमीयम (देकार) सन्मान बिल्डकॉन प्रा.लि. (जे.व्ही) नांदेड यांचे असुन रु. 13,05,00,000/- इतके भरले होते प्रिमियम रक्कम असल्याने संबंधीतांना कार्यालयीन पत्र क्रं. नावाशमनपा/साबांवि/8516/19 दिनांक 25.10.2019 रोजी प्रिमियम दर वाढविण्यासाठी वाटाघाटीसाठी पाचारण करण्यात आले असता. संबंधीतांनी वाटाघाटी अंती रु. 13,05,00,000/- प्रिमियम दरा ऐवजी प्रिमियम दरामध्ये वाढ करुन रु. 13,10,40,000/- रक्कमेस लेखी सहमती दिली आहे तसेच विकासाकडून खालील प्रमाणे सुविधा महानगरपालिकेस उपलब्ध होणार आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | वाहनतळ सुविधा | :- | नगररचना विभागाच्या डि.सी. रुल प्रमाणे |
| 2) | दुकानाचे क्षेत्रफळ | | |
| अ) | लोअर ग्राऊंड फ्लोअर | :- | 696.00 चौ.मि. |
| ब) | अप्पर ग्राऊंड फ्लोअर | :- | 140.00 चौ.मि. |
| 3) | भाजीपाला मार्केट क्षेत्रफळ | :- | 381.00 चौ.मि. (अप्पर ग्राऊड फ्लोअर) |
| 4) | लायब्ररी (Amenity) क्षेत्रफळ | :- | 61.24 चौ.मि. |

त्यानुसार प्रकल्प सल्लागार फोरट्रेस इन्फ्राकॉन लि. ठाणे (नांदेड) यांचे अभिप्राय मागविण्यात आले असता सल्लागार यांनी सदर ऑफर स्विकारणे योग्य असल्याचे पत्रान्वये कळविले आहे.

करिता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, महात्माफुले मार्केट PPP तत्वावर विकसीत करणेसाठी सन्मान बिल्डकॉन प्रा.लि. (जे.व्ही) नांदेड यांचे प्रिमीयम रक्कम रु. 13,10,40,000/- ची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 09** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके मार्फत गणपती उत्सव, दुर्गा महोत्सवच्या विसर्जनाच्यावेळी भाविंक हे गोदावरी नदीत विसर्जन करतांना नागरीकांच्या जिव धोक्यात असतांना त्या वेळेस गोदावरी जिवरक्ष सेवाभावी संस्था नांदेडचे जिवरक्षक हे अनेक नागरीकांच्या जिव वाचविण्याचे नेहमी कामे करीत आहेत. तसेच पावसाळयाच्या वेळी गोदावरी नदीत पुरआल्यास त्यावेळेस सुध्दा अनेक नागरीकांच्या जिव वाचविण्याचे काम नेहमी करीत असल्यामुळे त्यांना पारीतोषक प्रदान करण्यात आलेले आहे. त्यामुळे गोदावरी जिवरक्ष सेवाभावी संस्था नांदेडचे जिवरक्षक (1) श्री स. नुर स. एकबाल (2) स. अशफाक स. नुर (3) श्री प्रभाकर विठ्ठल कोमटवार (4) श्री स. मुस्ताक स. नुर (5) श्री कालीदास सुदाम खिल्लारे (6) स. आरेफ स. खादर (7) श्री बालाजी गणपत उकडे (8) स. शोऐब स. नुर हे जिवरक्षकांचे काम करीत असलेल्या जिवरक्षकांना मनपाकेत कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतनावर सामावुन घेण्यात यावे तसेच जिवरक्षक हे पद मनपाकेच्या आकृतीबंधात समाविष्ट करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**सुचक**:- स. शेर अली महेबुब अली

**अनुमोदक** :- अमीतसिंह तेहरा, अ. हफीज अ. करीम, अ. शमीम अब्दुल्ला, अ. लतीफ अ.मजीद, अ. रशीद अ. गणी, मसुद अहेमद खान, सय्यद शोएब

**<u>प्रशासकिय टिप्पणी</u>**

वरील प्रस्तावाच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या आस्थापनेवर जिवरक्षक या अभिनामाचे 01 पद मंजुर असुन सदर पद रिक्त नाही. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवर स्थायी / कंत्राटी विविध पदांची सरळ सेवेने भरावयाची झाल्यास नियमानुसार जाहीरात देवुन विहित पध्दतीचा अवलंब करुन विविध पदे भरण्यात येतात. प्रस्तावात नमुद जिवरक्षक यांना विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन कंत्राटी तत्वावर महानगरपालिकेत नियुक्त केलेले नसल्यामुळे संबंधीतांना मनपाकेत कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतनावर सामावुन घेता येणार नाही. तसेच जिवरक्षक हे पद मनपाकेच्या आकृतीबंधात समाविष्ट करता येणार नाही.

**विषय क्रं. 10** **प्रस्ताव**

दिनांक 26 मार्च 1997 रोजी नांदेड व वाघाळा या दोन नगरपालिकेचे एकत्रीतकरण करुन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अस्तित्वात आली असुन आजपावेतो या महापालिकेत कर्मचारी आकृतीबंध व सेवाप्रवेश नियम मंजुर घेण्यात आलेले नाही.

महाराष्ट्र शासनाने नगरपालिकास विभागने शासन परिपत्रक क्रं. जीईएन-1089/744/सिआर-235/89/नवि-14 दिनांक 14 ऑगस्ट 1990 च्या शासन परिपत्रकाव्दारे नगरपालिका अस्तित्वात असतांना नगरपालिकेतील विविध विभागातील कामाच्या व्याप्तीवर व गर्जेवर अवलंबित कर्मचारी वर्गाची रचना केली असुन त्यामध्ये शहर सफाई विभागासाठी मुकदम या अभिनामाची पदे मान्य केली आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मलनिस्सारण व पाणी पुरवठा विभागात झोन क्रं. 1,2,3,4 व सिडको एनआरपी येथील कार्यरत मजुरांच्या दैनंदिन कर्तव्यावर मागील 20 वर्षापेक्षा जास्ती कालावधील पासुन श्री जानाजी नारायण देशमुख पुरुष मजुर, श्री नागोराव चोखोबा हटकर पुरुष मजुर, श्री सय्यद हमीद सय्यद महेबुब पुरुष मजुर, व श्री संजय रामराव जाधव पुरुष मजुर हे काम पाहत आहेत त्यांना सदरील कामाचा प्रदिर्घ अनुभव आहे.

महाराष्ट्र महानरपालिका अधिनियमातील कलम 51 मधील तरतुदीनुसार वरील संबंधीत धारण करीत असलेले पुरुष मजुर या पदासाठी काणतीही नविन वेतनश्रेणी अनुज्ञेय न करता या प्रकरणी कोणतीही नविन पद निर्मिती नसल्याने व जेष्ठता यादीत कोणताही बदल न करता संबंधीत धारण करीत असलेल्या पुरुष मजुर या पदाचे नामाभिधान मुकादम असे करण्याची ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते समंत करते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- आनंद चव्हाण

<u>**प्रशासकिय अहवाल**</u>

मनपाकेत वरील कर्मचारी दिनांक 01.01.05 पासुन हे पाणी पुरवठा विभागातील मजुर म्हणुन कार्यरत आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 51 मधील तरतुदीनुसार वरील संबंधीत धारण करीत असलेले मजुर या पदासाठी कोणतीही नविन वेतनश्रेणी अनुज्ञेय न करता कोणतीही नविन पदनिमिती नसली तरी सबंधीत धारण करीत असलेल्या मजुर या पदाचे नामाभिधान मुकदम असे केल्यास संबंधीतांची सेवाजेष्ठता मुकदम या अभिनामाच्या पदाने होईल असा प्रस्ताव स. सदस्यांनी सादर केला आहे.

महाराष्ट्र शासनाने नगरपालिका विभागाने शासन परिपत्रक क्रं. जीईएन-1089/744/सिआर-235/89/नवि-14 दिनांक 14.08.1990 नुसार सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ नगरपालिका आस्थापनेवरील विविध विभागाची कर्मचारी वर्गरचनेतील कर्मचारी वर्ग हा मार्गदर्शक स्वरुपात असुन रचनेप्रमाणे अनुज्ञेय कर्मचारी पदांना मंजुरी समजण्यात येऊ नये असे नगरपालिकांच्या विशेषकरुन निदर्शनात आणण्यात येत असल्याचे परिपत्रकात नमुद आहे. त्यानुसार मनपा सफाई आस्थापनेवर मुकादम या अभिनामाचे पद मंजुर नाही त्यामुळे संबंधीतांचे मजुर या अभिनामाच्या पदाचे मुकादम असे नामाभिधान करता येणार नाही.

**विषय क्रं. 11** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेडच्या कार्यक्षेत्रात येणा-या आपल्या कार्यालयाचे 06 क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत येणा-या लाखो रुपयांची संपती, घर, दुकाने, प्लॉट, जमीन व कॉम्पलेक्स इत्यादी विकत घेणा-या खरेदीदार आपल्या (खरेदीदार) नावाने **नाव परिवर्तन** करुन घेण्यासाठी नांदेड मनपाकेच्या त्या त्या क्षेत्रीय कार्यालयात कागदपत्रांची संचिका दाखल केल्यानंतर संबंधीत क्षेत्रीय कार्यालया मार्फत स्थानिक वृत्तपत्रात ते-ते **नांव परिवर्तन** संबधीत जाहिर प्रगटन प्रसिध्दी करिता देऊन त्या प्रत्येकी नांव परिवर्तनच्या जाहिरातीचे खरेदी करणा-या मालमत्ताधारका कडुन त्या त्या वृत्तपत्राच्या मालकास लमसम फक्त रुपये 500/- (अक्षरी रुपये पाच शे फक्त) अदाई करण्यात येते.

पण मागील दोन वर्षापासुनप वृत्पपत्राला लागणा-या सर्वच सामुग्री (कागद, शाई, रिफीलिंग, शिवाय संगणक चालकाची फिस भाडे व इत्यादी खर्चात फारच भरमसाठ वाढ झाल्यामुळे वृत्तपत्राच्या मालकास संपती, घर, दुकाने, प्लॉट, फ्लॅट, जमीन व कॉम्पलेक्स इत्यादी विकत घेणा-या खरेदीदार आपल्या (खरेदीदार) नावाने **नांव परिवर्तन** जाहिर प्रगटनाचे लमसम फक्त 500/- अदाई करण्यात येते ते फारच कमी असल्याने आजच्या नांदेड मनपाकेच्या सर्वसाधारण सभेत हा प्रस्ताव सर्व मताने पारित झाल्यानंतर आज पासुन संपती, घर, दुकाने, प्लॉट, फ्लॅट, जमीन व कॉम्लेक्स इत्यादी विकत घेणा-याकडुन खरेदीदाराकडून प्रत्येकी वृत्तपत्रास **नांव परिवर्तन** जाहिर प्रगटनाचे लमसम रुपये 500/- ऐवजी वाढ करण्यासाठी हा प्रस्ताव आजच्या हया सर्वसाधारण सभेत सर्वमाताने पारीत करुन याचे इतिवृत्त याच सभेत कायम करण्यात येते.

**सुचक** :- फारुख अली खाँ **अनुमोदक** :- मसुद अहेमद खान, स. शेर अली

**विषय क्रं. 12** **प्रस्ताव**

श्री सुलेमान मैनोद्दिन शेख, हे जिल्हा परिषद पालघर अंतर्गत जि.प.प्रा.शा नडगेपाडा ता. जव्हार जि. पालघर येथे शिक्षण आस्थापनेवर प्राथमिक शिक्षक या पदावर दिनांक 21.01.2009 पासुन कार्यरत आहेत संबंधीतांच्या वैयक्तिक अडचणीमुळे नांदेड वाधाळा शहर महानगरपालिका नांदेड येथील शिक्षण आस्थापनेवर एकतर्फी आंतर जिल्हा बदलीने येण्यासाठी विनंती केलेली आहे.

करिता संबंधीतांच्या विनंती अर्जानुसार संबंधीतांची नांदेड वाधाळा शहर महानगरपालिका नांदेड येथे शिक्षण आस्थापनेवर एकतर्फी बदलीने सेवा वर्ग करणेसाठी ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- दयानंद नामदेवराव वाघमारे **अनुमोदक** :- महेंद्र हिरामण पिंपळे

<u>**प्रशासकिय अहवाल**</u>

श्री सुलेमान मैनोद्दीन शेख हे जि.प. पालघर अंतर्गत जि.प.प्रा.शा. नडगेपाडा ता. जव्हार जि. पालघर यांनी शिक्षण विभाग नावाशमनपा नांदेड येथे कार्यरत आस्थापनेच्या ना हरकत प्रमाणपत्रासह विहित नमुण्यातील रितसर प्रस्ताव (अनुषंगिक कागदपत्रासह) दाखल केल्यानंतर संबंधीतांची सदर आस्थापनेवर नावाशमनपा नांदेड येथे एकतर्फी आंतर जिल्हाबदलीने सेवा वर्ग करण्यासाठी शासनाच्या अटी व नियमाच्या अधिन राहुन उपसमिती व मा. आयुक्त यांची मान्यता घेऊन योग्यती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**विषय क्रं. 13** **प्रस्ताव**

नांदेड मनपा हद्दीत गोवर्धन घाट टेकडी येथील रहिवाश्याकरिता गोवर्धन घाट येथे बिएसयुपी वसाहत उभी करण्यात आलेली आहे परंतु हे लाभार्थी घरकुल घेण्यास तयार नाहीत कारण बिएसयुपी लाभार्थ्यांचा 2006 मध्ये सर्व्हे करतांना कुटूंबातील सदस्यसंख्या कमी होती. सुमारे 13 वर्षानंतर आज सालसन 2019 मध्ये त्या कुटूंबातील मुलांची लग्न होऊन सदस्यसख्येत वाढ झालेली आहे आज रोजी गोवर्धन घाट टेकडी येथील बिएसयुपी वसाहतीमध्ये स्थलांतरीत करावयाचे म्हणल्यास लाभार्थी कुटूंबातील सदस्यसंख्येच्या प्रमाणात घरकुलांचरी मागणी करत आहेत.

तसेच गोवर्धन घाट टेकडी भागातील सर्व्हे झालेल्या लाभार्थ्यांपैकी कांही लाभार्थ्यांकडे पि.आर. कार्ड आहेत. ते लाभार्थी बिएसयुपी वसाहतीमधील घरकुल घेण्यास तयार नाहीत त्यांचा विचार भविष्यातील एखादया योजने अंतर्गत करता येईल.

करिता सालसन 2006 मध्ये सर्व्हे झालेल्या लाभार्थ्यांचा पुन्हा सर्व्हे करण्यात येऊन जे लाभार्थी वसाहतीमध्ये राहायला जाण्यास तयार आहेत त्यांना त्यांच्या कुटूंबसंख्येच्या प्रमाणात घरकुल देण्यात यावेत. कारण जे पि.आर. कार्ड धारक घरकुलांमध्ये जाण्यास तयार नाहीत त्यांचे घरकुल सुध्दा इतर लाभार्थ्यांना द्यावयासाठी उपवलब्ध होतील की ज्यांचे कुटूंब सदस्यसंख्येत वाढ झालेली आहे.

ही संपुर्ण कार्यवाही पारदर्शीपणे नियमानुसार पार पाडण्यासाठी उपआयुक्त, कार्यकारी अभियंता बिएसयुपी, उपअभियंता बिएसयुपी यांची त्रिसदस्यीय समिती नियुक्ती करण्यासाठी मनपा सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर.

**सुचक**:- नवाब स.गुरमितसिंघ डिम्प ब-यामसिंघ, श्रीमती प्रभाबाई यादव **अनुमोदक** :- अमितसिंह तेहरा, सौ. कांताबाई मुथा

**विषय क्रं. 14** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील चौफाळा येथील मनपा तर्फे मागील 50 वर्षापुर्वी हे जलकुंभ बांधण्यात आलेली असुन सदरील जलकुंभचा कांही भाग वाकलेला आहे. त्याच्यात लहान सहान चिद्रे येऊन पाण्याची गळती सध्या चालु आहे. त्यामुळे सालसन 2015 साली सदर जलकुंभाचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यसात आले व त्यानुसार दुरुस्तीपण करण्याचे सल्ला देण्यात आला परंतु अद्याप पर्यंत दुरुस्ती करण्यात आलेली नसल्याने सदरचे जलकुंभा मधुन पाण्याची जास्तीची गळती होत असल्यामुळे धोकादायक सुध्दा झालेली आहे.

तसेच मुंबई येथे रेल्वे फुटबिज सारखी दुर्घटना या जलकुंभामुळे होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर जलकुंभाचे तात्काळ स्ट्रक्चर ऑडीट करणे आवश्यक आहे या जलकुंभातुन ज्या ज्या ठिकाणी पाणी पुरवठा करण्यात येत असुन त्या ठिकाणच्या नागरीकांची गैरसोई होवु नये म्हणुन एक नव्याने सदर ठिकाणी जलकुंभ शासनाच्या कोणत्याही निधीतुन बांधकाम करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**सुचक** :- शबाना बेगम मो. नासेर **अनुमोदक** :- अ. लतीफ अ. मजीद

**विषय क्रं. 15** **प्रस्ताव**

नावाशमनपाकेच्या प्रभाग क्रं. 18 अंतगत येत असलेल्या डंकीन परिसरामध्ये यापुर्वी सालसन 2018-19 मध्ये शासनाच्या योजनेतील निधीतुन वृक्षारोपन करण्यात आले होते. त्याची प्रसारमाध्यमांवर प्रसिध्दी देखील झाली होती. त्याठिकाणी महापालिकेने वृक्षारोपणाकरिता किती खर्च झाला ? एकूण किती झाडे लावण्यात आली ? आजमितीस लावण्यात आलेलया झाडांपैकी किती झाडे जिवंत आहेत ? व किती नाहीत ? तसेच या झाडांच्या सुरक्षेकरिता ट्री गार्ड देण्यात आले होते काय ? असल्यास किती ? व पाण्याची काय व्यवस्था करण्यात आली होती ? याची सविस्तर माहिती सभेपुढे सादा करुन यावर चर्चा करणे.

**सुचक** :- शोएब अफाक स. मजहर हुसेन **अनुमोदक** :- अ. शमीम अब्दुल्ला साब

**<u>प्रशासकिय टिप्पणी</u>**

उक्त ठिकाणी वृक्षारोपणाकरिता रु. 20,17,770/- ऐवढे प्रथम देयक अदा करुन सदर ठिकाणी 2429 झाडे लावण्यात आली संबंधीत कंत्राटदाराने कामात निष्काळजीपणा व उन्हाळयात निर्माण झालेली पाणी टंचाईमुळे सदरील ठिकाणची झाडे वाळुन गेलेली आहे. कामाच्या अटी व शतीरनुसार कंत्राटदाराने वृक्षलागवड पासुन 08 महिने देखभाल करणे अपेक्षित आहे वाळुन गेलेली झजडे पुन्हा लावण्याकरित संबंधीत कंत्राटदाराला निर्देशित करण्यात आले असुन संबंधीतांना प्रति दिन रुपये 500/- दंड आकारण्यात येत आहे संबंधीत कंत्राटदाराने सर्व 2429 झाडे पुन्हा वृक्षारोपण करुन देण्याची लेखी हमी दिलेली आहे.

**विषय क्रं. 16** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अंतर्गत शासनाकडुन प्राप्त निधीतुन अंदाजपत्रक दरापेक्षा जास्तीची रक्कम अंदाजपत्रकातील लांबी व रुंदी किंवा कांही बाबी कमी न करता मनपा निधीतुन अंदाजपत्रक दरापेक्षा जास्तीची रक्कम अदाई करण्यात यावे. भारत सरकार व महाराष्ट्र शासनाकडुन ज्या तारखे पासुन विविध कर लागु करण्यात येत आहे. अंदाजपत्रकात तो कर समाविष्ट नसते त्या त्या कराचे अंदाजपत्रकात काम पुर्ण हाण्यापुर्वी अंतीम देयकात समाविष्ट करुन देयक अदाई करण्यात

यावे तसेच ज्या अंदाजपत्रकात GST व Insurance समाविष्ट नाही त्या त्या अंदाजपत्रकात मनपा निधीतुन अंतीम देयकापुर्वी समाविष्ट करुन देयक तयार करुन अदाई करण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हयाच सभेत ठराव कायम करण्यात येतो.

**सुचक** :- उमेश चव्हाण **अनुमोदक** :- राजेश लक्ष्मीनारायण यन्नम

**विषय क्रं. 17** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीमध्ये शासनाच्या अमृत योजनेतुन मलनिस्सारण वाहिणीची कामे प्रस्तावित करण्यासाठी शासनाने महानगरपालिकेस सुचना / पत्र केंव्हा दिले होते ? शासनाचे पत्र प्राप्त झाल्यानंतर त्यावर काय कार्यवाही झाली ? व मलनिस्सारण वाहिनीची कामांसाठी डी.पी.आर. तयार करुन शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला आहे का ? किंवा त्या कामांचा डी.पी.आर. शासनाकडे पाठविला नसेल तर त्याची कारणे काय आहेत ? याची सर्वसविस्तर चर्चा करुन निर्णय घेणे बाबत.

**सुचक** :- राजु गोविंदराव काळे **अनुमोदक** :- सौ. दिपाली संतोष मोरे

**विषय क्रं. 18** **प्रस्ताव**

मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र 160 दिनांक 27.02.2017 नुसार शहरातील नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दी मधुन जाणा-या मुख्य रस्ते शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाने महानगरपालिकेस हस्तांतरीत केले होते.

तथापि सदरील मुख्य रस्ते हे अतिशय खराब झालेले असल्याने सदरील रस्त्यांची पुर्नबांधणी करण्यासाठी लागणारा निधी शासना मार्फत अथवा सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत प्राप्त करुन घेण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

**सुचक** :- अ. शमीम अब्दुल्ला साब **अनुमोदक** :- अ. रशीद अ. गणी

**विषय क्रं. 19** **प्रस्ताव**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण-8 मालमत्ता संपादन करण्या संबंधीचचा महापालिकेचा अधिकार कलम 76, 77, 78 संबंधी.

आय.टी.आय. चौक शासकिय तंत्रनिकेतन समोर उभारण्यात आलेल्या महापुरुष महात्मा ज्योतिबा फुले व करार तीज्योती सावित्रीबाई फुले यांचे पुतळयाच्या परिसरातील सर्व मोकळी जागा मनपाकेने आरक्षीत करुन सुशोभिकरणासह भाविकां करिता कार्यक्रमासाठी मंडप उभारावा व उर्वरीत जागेत उद्यान विकसीत करावे व लाखो भाविकांना दिलासा द्यावा. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधरण सभा दिनांक 05.08.03 ठराव क्रं. 66 नुसार शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) यांच्याकडून 285 चौ.मी. जागा संपादित करण्याची प्रक्रिया सुरु केली होती. जागेचा वाद कांही खासगी लोकां सोबत न्यायालयात असल्याच्या कारणाने वरील संस्थेने वाद मिटल्यानंतर जागा हस्तांतरणची तयार दर्शविली होती पण पुतळे एप्रिल-18 उभारावयाचे असल्याने मनपाकेने तातडीने खासगी लोकांकडून याच जमिनी मधील सर्वे नं. 74/2 पिआर कार्ड क्रं. 6470 च्या आधारे 74.50 चौ.मी. जागा रेडीरेकनर दरा प्रमाणे संपादित केली. 2018 मध्ये विद्यमान आयुक्त श्री लहुराज माळी मनपाचे आयुक्त आणि नांदेडचे ही प्रभारी जिल्हाधिकारी होते त्यांच्याकडे दोन्ही कार्यालयाचा पदभार असल्यामुळे त्यांनीच ही प्रक्रिया पूर्ण केली.

आज ज्या ठिकाणी या उभ्य दाम्पत्यांचे पुतळे उभारले आहेत त्या ठिकाणी 150 चौ.मी. त्याच जागेत पुर्वी म. फुले यांचा अर्धकृती पुतळा अनेक वर्षापासुन मनपाकेने उभारला होता तेंव्हा काणीही मालक म्हणून वारसाहक्क, मुखत्यापत्र, रजिस्ट्री, पि आर कार्ड, घेऊन पुढे आले नव्हते त्यावेळी शासकीय तंत्रनिकेतन प्रशिक्षण संस्था हीच मालक होती मनपाकेने आता 74.50 चौ.मी. जागा संपादन करतांना अनुसूची क्षेत्रा मध्ये सर्व चतु:सिमा निश्चित करते वेळी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) चा कुठे ही उल्लेख केला नाही त्यांनी असे उल्लेख केले - वर्कशाप ते शिवाजीनगर, पिश्चम मनपाकेची जागा उत्तर भुसंपादन ज्या जागेचे करावयाचे आहे त्या जागा मालकाची उर्वरीत जागा दक्षिण भुसंपादन ज्या जागेचे करावयाचे आहे त्या जागा मालकाची उर्वरीत जागा असा सारखा उल्लेख करणे म्हणजे पुतळयाच्या आडून सर्व उर्वरीत जागेवर मालक सिध्द करावयाचा आहे का हेच त्याच्यातुन निष्पन्न होते ही अधिकृत अनुसूची मनपा आयुक्तांच्या आदेशान्वये दिनांक 17.11.18 रोजी काढली आहे. कोणत्याही कायौलया समोरची मोकळी जागा ही कशी काय दुस-याची असू शकते हे एक गंभीर कोडे आहे जागेचा कोणा सोबत कोणताही वाद असो, मनपाकेने येथील सर्व मोकळी जागा तातडीने आरक्षीत करावी मनपाकेने त्या जागे वर जर तात्पुरते टिनचे कंपाऊंड उभारण्याचे किंवा इतर कांही तात्पुरत्या परवानगी दिल्या असतील तर त्या त्वरीत रद्द करण्यात याव्यात पुढे रितसर जे कोणी कायदेशीर मालकी हक्का बाबत सर्व दस्त मा. न्यायालयानचे अंतिम निकाल घेऊन मनपाकडे येतील तेंव्हा कायदेशीर भुसंपादन मावेजा बाबत अर्ज करु शकतील महात्मा फुले व सवित्रीबाई फुले हे लाखो लोकांचे श्रध्दा आणि अस्मितेचे प्रतीक आहेत त्यामुळे येथे लाखो भाविक दर्शनाला येतात, येथुनच सर्व महापुरुषांच्या जयंतीनिमित्त मिरवणुक निघतात, पुध्यतिथी कार्यक्रम असोत की शालेय प्रभातफेरी, सांस्कृतिक व शासकीय संदेश देण्याचा कार्यक्रम असे अनेक सोहळे येथे होतात मोर्चा, धरणे आंदालन, अभिनंदन उत्सव येथे साजरे केले जातात आय.टी.आय चौक हा नेहमी गर्दीने गजबजलेला असतो दक्षिण ते उत्तर नांदेडला जोडणारा हा प्रमुख मार्ग आहे रहदारीमुळे व येथील रस्त्यावर होणा-या कार्यक्रमामुळे येथील दळणवळण व्यवस्था

ठप्प होते त्यामुळे वाहतुक पोलीसांवर मोठा ताण पडत असतो या बाबीचा विचार करावा लागेल पुतळा परवानगी आदेशातील 01 ते 11 सुचनांचे पालन करण्याच्या दृष्टीने विचार केल्यास भविष्यात येथे रस्ता रुंदीकरण, विस्तारीत मोठा आयटीआय चौक, पुतळयाचे संरक्षणासाठी मोकळी जागा ठेऊन घराबंदी, तसेच उभारलेल्या पुतळयाच्या सुशोभिकरण भिंती या भिन्न प्रकारच्या दिसत असल्यामुळे त्या व्यवस्थित शोभुन दिसतील असे आर्किटेक्ट कडून काम करण्यात यावे मनपासर्वसाधारण सभा दिनांक 05.08.03 ठराव क्रं. 66 व दिनांक 31.03.15 ठराव क्रं. 206 नुसार मान्यता दिलेली आहे.

पुतळया जवळ कार्यक्रमासाठी मोकळी जागा नसल्यामुळे, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) समोरील व पुतळयाच्या दोन्ही बाजुच्या परिसरातील सर्व मोकळी जागा महापालिकेने आरक्षित करण्याचा व तिथे उभारलेल्या ठिन पत्राचे कंम्पाऊंड मुळे पुतळा शिवाजीनगर व पोलीस कॉलनी कडून येतांना आणि जातांना दिसत नसल्यामुळे जण भावनेचा विचार करुन पुतळयाचे होत असलेले विद्रुपीकरण थांबविण्यासाठी दिलेली परवानगी रद्द करण्याचा व 07 दिवसात टिनपत्रे ताबडतोब काढून काढण्याचा आदेश द्यावा अन्यथा मनपाकेने कारवाई करुन टिनपत्रे काढावी अशी ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा प्रस्ताव याच सभेत सर्वानुमते समंत करण्यात येतो.

**सुचक** :- बापुराव गजभारे **अनुमोदक** :- सय्यद शेर अली, महेंद्र पिंपळे

**विषय क्रं. 20** **प्रस्ताव**

नांदेड शहरातील प्रभाग क्रं. 17 गुरुव्दारा अंतर्गत गोवर्धन घाट लगत असलेल्या कुंभारगल्ली भागामध्ये त्या ठिकाणी राहणारे नागरीक हे मागील 70-80 वर्षापासुन वास्तव्य करतात या भागामध्ये सन 2006 मध्ये स्मशानभुमिकरिता विकास आराखडयात आरक्षित करण्यात आले आहे परंतु आरक्षण टाकल्यानंतरही तेथील ब-याच लाभार्थ्यांना घरकुले मंजुर झाली व घरकुलांमध्ये नागरीक राहत आहेत व ज्या प्रयोजनासाठी लागा आरक्षीत केली होती ते विकासकाम अद्याप झालेले नाही बरेच नागरीक हे घरकुलापासून वंचीत राहीले असल्याने घरकुलांची मागणी होत असल्याने सन 2006 मध्ये कुंभार गल्ली येथील मंजुर आरक्षण रद्द करुन सदर जागेवर शिल्लक राहीलेल्या कुटूंबांना घरकुल मंजुर करण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- सौ. कांताबाई प्रकाशचंद मुथा **अनुमोदक** :- श्रीमती प्रभाबाई इर्श्वरभैय्या यादव

**विषय क्रं. 21** **प्रस्ताव**

आपल्या देशाचे सैनिक हा कुटूंबाच पासुन कित्येक वर्ष दुर राहून प्राणाची बाजी लावण्यास सदैव तयार असतात सैनिक सिमेवर आपल्या देशाची रक्षा करतात म्हणुन देश सुरक्षित आहे.

परंतु सैनिकांचे जिवन अतिशय खडतर असुन इतर महानगरपालिकेच्या धर्तीवर नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका तर्फे शहरातील आर्मी व बिएसएफ चे आजी-माजी सैनिक व त्यांच्या विधवा पत्नीच्या नावे असणा-या मालमत्तेचा करात नियमानुसार माफी अथवा सुट देण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- सौ. जयश्री निलेश पावडे **अनुमोदक** :- सौ. कविता संतोष मुळे

**विषय क्रं. 22** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका विशेष सर्वसाधारण दिनाक 11.09.2019 ठराव क्रं. 33 व्दारे आस्थापनेवर कार्यरत असलेलया अधिकारी/कर्मचा तसेच सेवानिवृत्त कर्मचा-यांना 7वा वेतन आयोग लागुर करण्यासमान्यता प्रदान केली आहे. तसेच नांदेंड नगरपालिकेची 1952 ला स्थापना झाल्या पासुन आज पर्यंत विविध पदे मान्यतेचे अधिकार सक्षम प्राधिकरणाने मान्यता दिलेली असुन ते आज पर्यंत कार्यान्वीत असुन सदरील पदावरील अधिकारी/कर्मचारी यांना निवृत्ती वेतनधारकांना निवृत्तवेतन देण्यात येत आहे. मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार शासनाने मनपाकेतील वरिष्ठ लिपीक यापदांना दिनांक 13 ऑगस्ट 2015 रोजी दिलेल्या वेतनश्रेणीस मान्यता नियमानुसार दिलेली असुन सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनश्रेणी लागु करण्यास मान्यात देण्यात येते. तसेच या महापालिकेतील विधी अधिकारी, उद्यान अधिक्षक, मालमत्ता व्यवस्थापक या इतर समक्ष पदांना 7व्या वेतन आयागानुसार सुधारीत वेतनश्रेणी लागु करण्यास करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- आनंद चव्हाण **अनुमोदक** :- अमितसिंह तेहरा

**विषय क्रं. 23** **प्रस्ताव**

मनपा हद्दीतील प्रभाग क्रं. 03 सांगवी येथे श्रमिक पुतळयाच्या बाजुला जुनी पोलीस चौकी होती रस्त विस्तारीकरणात व श्रमिक पुतळयाच्या सेशोभिकरणात पोलीस चौकीचीच जागा गेल्यामुळे पुतळयाच्या डाव्या बाजुतील मनपाकेच्या जागेवर नविन पोलीस चौकी उभारण्याकरिता ना हरकत पमाणपत्र देणे करिता हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- सौ. करुणा भिमराव कोकाटे **अनुमोदक** :- श्रीमती कौशल्या शंकर पुरी

**विषय क्रं. 24** **प्रस्ताव**

श्री गुरुप्रसाद विठ्ठलराव कदम हे जिल्हा परिषद शाळा खोकरीचीवाडी केंद्र गुंडे ता. शहापुर जि. ठाणे येथील शिक्षण आस्थापनेवर सहशिक्षक या पदावर कार्यरत असुन त्यांची एकूण 10 वर्षाची सेवा झाली आहे त्यांची पत्नी नायगांव येथील जिल्हा परिषद शाळेवर कार्यरत आहे त्यांच्या व्यक्तीगत अडचणीमुळे व पती-पत्नी एकत्रीकरण अंतर्गत नांदेड वाघाळा शहर

महानगरपालिका येथील शिक्षण आस्थापनेवर एकतर्फी आंतर जिल्हा बदलीने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड येथील शिक्षण आस्थापनेवर एकतर्फी बदली करणे करिता ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते आणि शिक्षण आस्थापनेवर एकतर्फी आंतर जिल्हा बदलीने त्यांची सेवा वर्ग करण्यास मान्यता देते व याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- आनंद चव्हाण

**विषय क्रं. 25**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 20(3) नुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे स्थायी समितीचे 16 सदस्यापैकी खालील (8) सदस्य दिनांक 01.12.2019 रोजी दुपारी निवृत्त होत आहे.**

1) खान फारुख अली इलीयाज खान, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष**
2) अब्दुल शमीम अब्दुल्ला साब, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष**
3) खान म. मसुद अहेमद खान उस्मान खान, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष**
4) येवनकर मोहीनी विजय, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष**
5) अ. लतीफ अ. मजीद, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष**
6) रावत भानुसिंह गयादिनसिंह, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष**
7) नवाब गुरमितसिंघ ब-यामसिंघ, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष**
8) वैशाली मिलिंद देशमुख, **भारतीय जनता पार्टी**

करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 20(5) अन्वये नांवामनपाकेच्या स्थायी समितीच्या निवृत्त होणा-या वरील सदस्यांच्या रिक्त (8) जागावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 31-अ नुसार नविन (8) सदस्यांची नामनिर्देशानाव्दारे नेमणूक करण्यासाठी प्रस्ताव सादर.

<u>टिप:-</u> शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-2010/प्र.क्र.-85/नवि-32 दिनांक 06 जूलै 2010 नुसार विरोधी पक्ष नेते, सभागृह नेते, गट नेत्यामार्फत स्थायी समितीवर तौलनिक संख्याबळाच्या आधारावर पालिका सदस्याची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी नांवे पाठवितांना ती बंद लखोटयात सभेच्या वेळी महापौराकडे देण्यात यावीत. सभेच्या दिवसापुर्वी सदर नांवे महापौरांना बंद लखोटयात द्यावयाची असतील तर त्या पत्राची एक प्रत बंद लखोटयात, आयुक्तांना सुध्दा देण्यात यावी.

**स्वाक्षरीत/-**

**( स. अजीतपालसिंघ संधु )**

**नगरसचिव**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**